# संबंधित कृती आणि प्रकल्प



## १. स्रोत धारिका (Resource File) तयार करणे.

१.१ बालगीतांचा संग्रह तयार करणे.

१.२ बालकथा संग्रह तयार करणे.

१.३ शब्दकोडी संग्रह तयार करणे.

१.४ चित्रसंग्रह (बालकाशी संबंधित, त्यांचा सभोवताल, खेळणी) करणे.

१.५ वर्तमानपत्र, मासिके यातून बालकांविषयी किंवा बालविकास, बालसंगोपन याविषयी येणाऱ्या लेखांचा संग्रह करणे.

### १.१ बालगीतांचा संग्रह करणे :

सोपी, ओळखीचे शब्द / भाषा, शब्दांची पुर्नरावृत्ती, आकर्षक चाल, गाताना विविध हातवारे, हालचाली करून म्हणता येतील अशी असावीत.

गाणी बालकांच्या परिसराशी, अनुभवाशी, मिळती-जुळती असावीत. बालकांच्या क्रयशक्तीला आणि भावनांना वाट करून देणारी असावी. गाण्याची लांबी, भाषा त्यांचा वयोगट विचारात घेऊन निवडावी.

### गाण्यांचे प्रकार

- निरर्थक बडबडगीते

  उदा., आपडी- थापडी गुळाची पापडी, चालचाल माते पायी रुतले काटे

  ये रे ये रे पावसा तुला देतो पैसा

- कृती गीते

  उदा., हात ठेवा डोक्यावर, हात ठेवा खांद्यावर

  हात ठेवा छातीवर, गिरकी मारा गरगरगर

  चवड्यावरीत उभे राहूनी झरझर चालू या

- गोष्टी

- उदा., एक होतं जंगल. त्या जंगलात एक ससा रहात होता... तो खूप घाबरट.... वारा सुटला.... सशाच्या पाठीवर पडले.... आभाळ पडलं.... घाबरुन पळत सुटला .... वाटेत इतर प्राणी भेटले.... सगळे पळत सुटले.

- सिंह आणि उंदीर, कावळा आणि चिमणी

- टंग ट्वीस्टर (जिभ वळणे)

  उदा., चमच्याने चटणी चाटली. कात्रीने कागद कापला.

- अक्षरे, स्वर- व्यंजने

  उदा., अ- आ-आई, म- म- मका

  मी तुझा मामा, दे मला मुका.

  लाल टांगा घेऊनी आला, लाला टांगेवाला, ऐका लाला गातो गाणे, ल ल ल ल ला.

### स्त्रोत –

बडबडगीते / गाणी – पुस्तके, मासिके, इंटरनेट, सी.डी. या माध्यमातून गोळा करावीत. तुम्हाला रचता येत असतील तर तुम्ही स्वतः निर्माण करावीत.

## १.२ बालकथा संग्रह तयार करणे :

### गोष्ट सांगताना लक्षात घेण्याचे मुद्दे :

गोष्टी मध्ये काही शब्दसमुह, गंमतीदार आवाज परत परत यावेत. गोष्ट सोपी, मुलांना खिळवून ठेवणारी, वयानुरुप, ओळखीच्या प्रसंगावर आधारीत असावी. त्यात आश्चर्य, कुतुहल, उत्सुकता असावी. नैतिकतेचे धडे देणारी नसावी.

गोष्टी मधे मुख्य एक व इतर दोन किंवा तीन जास्तीत जास्त पाच किंवा सहा व्यक्तीरेखा (पात्र) असाव्यात. त्यांच्यात व्यवस्थित संवाद असावा व पटेल असा संघर्ष असावा.

सोपी भाषा असली तरी काही नवीन शब्द असावेत, जेणेकरून मुलांचा शब्दसंग्रह वाढेल. परीकथा, भूत, राक्षस, सावत्र कुटुंब, मरणाची संकल्पना असणाऱ्या गोष्टी नसाव्यात.

### गोष्ट सांगण्याची तंत्रे

गोष्टीची पुस्तके, फ्लॅशकार्डस् (क्षणचित्रे), पपेटस् (कठपुतळी बाहुल्यांच्या साहाय्याने), तक्ते (चार्ट), फ्लीप चार्ट, चित्रपुस्तिका, OHP, PPT च्या साहाय्याने गोष्ट सांगता येते.

### स्रोत –

- गोष्टीची पुस्तके, मासिके यातून मुलांच्या गोष्टी गोळा करणे.
- पारंपारिक कथांमधे मुलांच्या वयानुरुप, समजेनुसार बदल करून गोष्ट तयार करणे. CDs
- तुम्ही वरील मुद्दे लक्षात घेऊन स्वतः गोष्ट तयार करू शकता.

## १.३ शब्दकोडी

शब्दकोडी निवडताना लक्षात घेण्याचे मुद्दे. ओळखीची सोपी भाषा, कुतूहल वाढवणारी, कारणे शोधून विचार करायला लावणारी, सजीव, निर्जीव, वस्तूबद्दल शब्दसंग्रह वाढविणारी, यमक जुळणारी, काव्यात्मक वर्णन करणारी, वयानुरुप असावीत.

**उदा.** ३-६ वर्षे वयोगटासाठी 'मी कोण?' सारखी शब्दकोडी देता येतील ज्यामध्ये व्यक्ती / फळे / भाज्या / वहाने / किंवा इतर कोणत्याही वस्तूंवर बनवता येतील.